# श्रीगुरुमाईंच्या वचनांवर ध्यान

## ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

### मकरसंक्रांतीचा उत्साह–भाव

सत्संगामधील आणखी एका गोष्टीचा विचार मी करत आले आहे आणि ती गोष्ट म्हणजे श्रीगुरुमाईंनी मकरसंक्रांतीविषयी व भारतात मकरसंक्रांती हा सण ज्या भावनेने साजरा केला जातो, त्याविषयी काय सांगितले होते. श्रीगुरुमाईंनी सांगितले की, या दिवशी लोक तिळगुळाचे लाडू आणि वड्यांचा आस्वाद घेतात; ते पतंग उडवतात, खेळतात, उत्सव साजरा करतात आणि या मंगलमय दिवसाचा आनंद लुटतात.

श्रीगुरुमाईंनी केलेले मकरसंक्रांतीचे हे वर्णन मला खूप आवडले. याच्याशी निगडित अशा अनेक आठवणी एकाएकी माझ्या मनात उद्‌भवू लागल्या. माझी आई तिळगुळाच्या वड्या बनवत असे, वडी खात असताना ती दातांना चिकटत असे आणि तरीदेखील अधीरतेने मी पुन्हा आणखी काही वड्या घेत असे. मुंबईच्या गगनचुंबी इमारतींच्या छतांवर उभे राहून, हास्यकल्लोळ करणारी मुले जी स्वतः बनवलेले पतंग उडवत असत; निरनिराळ्या आकारांच्या व रंगांच्या पतंगाचे ते जणूकाही एक अनोखे प्रदर्शनच असे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे माझ्या अंतरी श्रीगुरुमाईंच्या शब्दांनी नाविन्याची व संभावनेची भावना जागृत केली, जी माझ्यासाठी मकरसंक्रांतीशी निगडित आहे—तो प्रखर प्रकाश, सूर्याचा प्रकाश. तो अबाधित आनंद व उल्लास, जो जणूकाही सोनेरी तारकांच्या नदीप्रमाणे अत्यंत वेगाने वर आकाशाकडे जातो आहे.

मकरसंक्रांतीच्या दिवशी, असे वाटते की, या ब्रह्मांडाचा तराजू चांगुलपणा व गोडवा यांच्याकडे झुकला आहे, कारण आपणच त्याला त्या दिशेला झुकवले आहे. लोक एकमेकांबद्दलचे त्यांचे प्रेम आणि कृतज्ञता अभिव्यक्त करतात. श्रीगुरूंप्रति असलेल्या आपल्या प्रेमाखातर आपण सिद्धयोगी एकत्र येतो; श्रीगुरूंनी आपल्याला भगवंताच्या ज्या प्रकाशाप्रति जागृत केले आहे, त्या प्रकाशाच्या ऊबदारपणात आपण न्हाऊन निघतो. या दिवशी, धरती आणि स्वर्ग यांच्यामधील पडदा अधिकच पातळ व पारदर्शक

वाटू लागतो. हे दोन्ही लोक सुरुवातीपासूनच जरी भिन्नभिन्न होते, तरीदेखील यांच्यातील संबंध आता अधिक प्रवाही, अधिक सहज वाटू लागतो.

बाळकृष्णाची छबी माझ्या मनात गिरिधराच्या रूपात प्रकट होते. भगवान श्रीकृष्णाने देवराज इंद्राच्या प्रचंड क्रोधापासून आपल्या संपूर्ण गावाचे रक्षण केले होते. त्या सर्वांचे रक्षण करण्यासाठी त्याने स्वतःच्या एका करंगळीवर संपूर्ण पर्वत उचलला आणि सर्व लोक श्रीकृष्णाच्या आवतीभोवती एकत्र येऊन, पर्वताच्या खाली जमले होते. आशा स्पष्टपणे दृग्गोचर होते—धर्माचरण हे आणखीनच साध्य करण्याजोगे वाटते—जेव्हा आपण सर्वजण भगवंताच्या व श्रीगुरूंच्या संरक्षणामध्ये अशा प्रकारे एकत्र आश्रय घेतो.

आपण सिद्धयोग मार्गावर जो कोणताही सण साजरा करतो, त्याला एक गहन आणि विशिष्ट अर्थ असतो. प्रत्येक सणाचा एक वेगळाच भाव असतो आणि त्याच्याशी निगडित अशा अजूनही खूप काही गोष्टी व भाव-भावना असतात. मकरसंक्रांतीविषयी बोलत असताना श्रीगुरुमाई हीच गोष्ट शिकवत आहेत असे माझ्या लक्षात येत होते.

अधिक विस्तारपूर्वक सांगायचे झाल्यास, श्रीगुरुमाईंच्या शब्दांमधून मी जे शिकले, ते म्हणजे आपण कुठे आहोत, आपण काय करतो आहोत आणि आपण ते त्या प्रकारे का करत आहोत याविषयी आपण सतत सजग राहिले पाहिजे.

भारताचे संतकवी त्यांच्या श्रीगुरूंच्या किंवा त्यांच्या आराध्यदेवतेच्या सान्निध्यात घालवलेल्या एखाद्या दिवसाचे महिमागान करण्यासाठी समग्र भजनांची वा अभंगांची रचना करत असत. उदाहरणार्थ, मला असे अनेक प्रसंग आठवतात, जेव्हा दर्शनाच्या आणि सत्संगाच्या दरम्यान, शांभवी क्रिश्चियन, विजूताई कुलकर्णी आणि लक्ष्मी वेल्स् यांसारख्या ज्येष्ठ सिद्धयोग गायिकांना श्रीगुरुमाई 'आजी सोनियाचा दिनु' हा अभंग गायला सांगत असत. या अभंगाची रचना संतकवी ज्ञानेश्वर महाराजांनी केली आहे आणि त्यात ते म्हणतात : *"आजी सोनियाचा दिनु!* आज सोनेरी दिवस आहे!"

शांभवी, विजुताई आणि लक्ष्मी यांना असामान्य प्रतिभा आणि कौशल्य लाभले आहे. त्या अनेक दशकांपासून सत्संगांच्या दरम्यान, दर्शनाच्या समयी आणि सिद्धयोग रेकॉर्डिंग्ज्साठी गायनाची सेवा अर्पण करत आल्या आहेत. आता तर विश्वभरातील सिद्धयोग्यांना त्यांचे आवाज परिचित व प्रिय झाले आहेत. म्हणून यांच्यापैकी कोणीही जेव्हा "आजी सोनियाचा दिनु"सारखा अभंग गातात, मग त्या एकट्या गात असोत वा संगीतमंडळीसमवेत गात असोत, त्यांचे ते गायन ऐकणे म्हणजे अतिशय अलौकिक सुखानुभूतीच असते. आपण त्यांच्या गायनातच "त्या दिवसाचा सोनेरीपणा" अनुभवतो.

मला वाटते की, स्वतःला हे विचारण्याची सवय आपण लावली पाहिजे : या दिवसाची ऊर्जा, या दिवसाचा भाव काय आहे? ते काय आहे, जे *या* दिवसाला सोनेरी बनवते?" आपण सदैव या गोष्टीसाठी प्रयत्न केला पाहिजे की, आपण स्वतःला या प्रज्ञानाने संपन्न करावे आणि त्यानुसारच विचारपूर्वक, समजूनउमजून बोलावे व आचरण करावे.

तुम्ही या गोष्टीशी सहमत नाही का? तुम्हाला असे वाटत नाही का की, आपले अस्तित्व एखाद्या विशेष, एखाद्या अर्थपूर्ण गोष्टीसाठी असायला हवे? आपण विचारशीलतेसह, सजग राहून जगायला नको का?

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.